Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)




ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Part - IV / Marathi

Impact Factor / Indexing
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

Scanned with CamScanner

# EDITORIAL BOARD

**Professor Kaiser Haq**
Dept. of English, University of Dhaka,
Dhaka 1000, Bangladesh.

**Roderick McCulloch**
University of the Sunshine Coast,
Locked Bag 4, Maroochydore DC,
Queensland, 4558 Australia.

**Dr. Ashaf Fetoh Eata**
College of Art's and Science
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

**Dr. Nicholas Loannides**
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,
Faculty of Computing, North Campus,
London Metropolitan University, 166-220 Holloway Road,
London, N7 8DB, UK.

**Muhammad Mezbah-ul-Islam**
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

**Dr. Meenu Maheshwari**
Assit. Prof. & Former Head Dept.
of Commerce & Management
University of Kota, Kota.

**Dr. S. Sampath**
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

**Dr. D. H. Malini Srinivasa Rao**
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University
Karaikal - 609605.

**Dr. S. K. Omanwar**
Professor and Head, Physics,
Sat Gadge Baba Amravati
University, Amravati.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean, School for Environmental
Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar
University Raebareily Road, Lucknow.

**Dr. Shekhar Gungurwar**
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

**Memon Sohel Md Yusuf**
Dept. of Commerece, Nirzwa College
of Technology, Nizwa Oman.

**Dr. S. Karunanidhi**
Professor & Head,
Dept. of Psychology,
University of Madras.

**Prof. Joyanta Borbora**
Head Dept. of Sociology,
University, Dibrugarh.

**Dr. Walmik Sarwade**
HOD Dept. of Commerce
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad.

**Dr. Manoj Dixit**
Professor and Head,
Department of Public Administration Director,
Institute of Tourism Studies,
Lucknow University, Lucknow.

**Prof. P. T. Srinivasan**
Professor and Head,
Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

**Dr. P. A. Koli**
Professor & Head (Retd.),
Department of Economics,
Shivaji University, Kolhapur.


Scanned with CamScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | मानवाधिकार आणि भारतीय समाज<br>**प्रा. डॉ. परमानंद बावनकुळे** | १-८ |
| २ | मानवी अधिकार व महिला<br>**प्रा. विठ्ठल सदाशिव चौधरी** | ९-१२ |
| ३ | अल्पसंख्याक वर्ग आणि मानवाधिकार<br>**डॉ. सुहास बुधाजी तेलंग** | १३-१५ |
| ४ | बालकांचा शिक्षणाचा अधिकार व मानवी हक्क<br>**प्रा. डॉ. संजय गोरे** | १६-१८ |
| ५ | समलैंगीक : (LGTB) समुदाय के मौलीक अधीकार और भारतीय समाज<br>**प्रा. मंगेश शामराव करंवे** | १९-२२ |


Scanned with CamScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# ३. अल्पसंख्याक वर्ग आणि मानवाधिकार

डॉ. सुहास बुधाजी तेलंग
विवेकानंद महाविद्यालय, भद्रावती.

**सारांश**

मानवाला सन्मानाचे जगण्यासाठी स्वातंत्र्य आणि काही अधिकार आवश्यक आहेत हे अधिकार म्हणजेच मानवाधिकार म्हणून ओळखले जातात. अल्पसंख्यांक समुदायांना जगात व भारतात सुध्दा अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. पुर्विच्या काळी काही अल्पसंख्यांक समुदायांच्या सन्मानाने जगण्याचा अधिकार सुध्दा हिरावून घेण्यात आला होता. संयुक्त राष्ट्र संघाने सुध्दा अल्पसंख्यकांच्या अधिकारांच्या रक्षणासाठी 1947 मध्ये उपआयोगाची स्थापना केली आहे. तसेच भारताने सुध्दा आपल्या संविधानात अल्पसंख्यकांच्या विकासाकरीता अनेक तरतुदी केल्या आहेत. परंतु त्याची अंमलबजावणी पाहिजे तितकी प्रभावी दिसून येत नाही त्यामुळे अल्पसंख्यांक समुदायांच्या समस्या आजही कायम आहेत.

**बिजशब्द :–** मानवाधिकार, अल्पसंख्यांक, संविधान, संयुक्त राष्ट्रसंघाच्या

**प्रस्तावना**

विसाव्या शतका पासुन मानवाधिकारांचा जोरदार पुरस्कार करण्यात येवू लागला आहे.वर्तमान काळात मानवाधिकार हा विषय राजकिय परिक्षेत्रात चर्चेचे मुख्य केंद्र आहे. यात पहिला गट अशा देशांचा आहे जे विकसित आहेत. आणि त्यांचा आग्रह अशा सर्व राजकीय व्यवस्थांबाबत आहे. जिथे व्यक्तींच्या अधिकारांचे विशेषतः स्वातंत्र्याच्या अधिकाराची अवहेलना होत आहे. अशा देशांसाठी लोकतंत्र, स्वतंत्र्यता व्यक्तींच्या संदर्भात जास्त महत्वपूर्ण आहेत. जरी त्यांच्या स्वतःच्या देशातील लोकशाही मध्ये कितीही उणिवा असतील तरी. दुसरा गट अशा विकसनशिल देशांचा आहे. जिथे मानवाधिकाराबाबत सरकार आणि राजकिय संस्थांची कोणतीही स्पष्ट भूमिका नाही अशा देशांत अनेक समस्या आहेत आणि जर सरकारने हस्तक्षेप नाही केला तर नागरिकांची स्वातंत्र्यता जवळपास संपूष्टात आणल्या जावू शकते असे राजकिय व सामाजिक वातावरण आहे. तरी सुध्दा या देशांपूढे प्रमुख प्रश्न मानवाधिकार, स्वतंत्र्यता, लोकशाही ही नाही तर देशातील अनेक मुलभुत साधनांची कमतरता या विरोधात लढणे हा आहे. अशा देशांत अल्पसंख्यांकाच्या मानवाधिकाराचा प्रश्न प्रकर्षाने जाणवतो.

**मानवाधिकाराची संकल्पना**

मानवाधिकार म्हणजे मानवाचे मुलभुत अधिकार आहेत. हे अधिकार उपजत किंवा कायदेशिर असु शकतात हे अधिकार जागतिक असुन ते सर्वांना समान आहेत.

दुसरे महायुध्द संपल्यानंतर युध्दाचे भयंकर परिणाम बघीतल्यानंतर मानवजातीची युध्दासारख्या भयानक आपत्तीपासुन सुटका करण्यासाठी काहीतरी उपाययोजना करण्याची आवश्यकता जागतिक समुदायाला वाटु लागली 24 आक्टोबर रोजी 1945 संयुक्त राष्ट्र संघाचा स्थापना झाली. संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेचा प्रमुख उदेश जागतीक



Scanned with CamScanner

शांततेसाठी प्रयत्न करणे हा असला तरी संयुक्त राष्ट्रसंघाने मानवी अधिकारांचे संरक्षण देखिल आपले एक मुख्य उदीष्ट असण्याचे घोषीत केले. मानवी अधिकार आणि मुलभुत स्वातंत्र्य याची हमी मिळाल्याशिवाय आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता यांचे रक्षण करणे शक्य होणार नाही याची पुरेपूर जाणीव संयुक्त राष्ट्र संघाच्या संस्थापक राष्ट्रांना होती, म्हणुन त्यांनी मानवी अधिकार आणि मानवी प्रतिष्ठा या गोष्टींनाही तितकेच महत्व दिले होते. त्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदे मध्ये मानवी अधिकारासंबंधी स्पष्ट तरतुदी करण्यात आल्या आहेत.

**मानवाधिकार आयोग**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या आर्थिक व सामाजिक समितीने 16 फेब्रुवारी 1946 रोजी मानवी अधिकार आयोगाची स्थापना केली या आयोगाची सदस्य संख्या ५३ आहे. त्यांची निवड संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेकडून होते. मानवी हक्क आयोग ही संयुक्त राष्ट्र संघाची एक महत्त्वाची संस्था म्हणून ओळखली जाते.

**अल्पसंख्यांकां संबंधीचा उपआयोग**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी हक्क आयोगाने 1947 मध्ये अल्पसंख्याका संबंधीच्या उपआयोगाची स्थापना केली. या आयोगात सव्वीस सदस्य आहेत. हे सदस्य जगाच्या वेगवेगळ्या प्रादेशिक विभागांचे किंवा क्षेत्राचे प्रतिनिधित्व करतात.

या उपआयोगाची स्थापना मानवी हक्कांचे संरक्षण करणे या उद्देशाने करण्यात आली आहे. जगाच्या कोणत्याही भागात अल्पसंख्यकांबाबत कोणत्याही प्रकारचा भेदभाव किंवा अन्याय होणार नाही हे पाहण्याची जबाबदारी या उपआयोगावर सोपविण्यात आली आहे.

**अल्पसंख्यांक वर्ग आणि मानवाधिकार**

भारतीय संविधानात अल्पसंख्यांक या शब्दाची कोणतीही स्पष्ट व्याख्या करण्यात आलेली नाही. लोकसंख्या आणि भाषेच्या आधारावर भारत सरकारने अल्पसंख्याकांसाठी राष्ट्रीय आयोग कायदयातील तरतुदी अंतर्गत मुस्लीम, शीख, ख्रिश्चन, बौध्द व पारशी या पाच जमातींना अल्पसंख्यांक जमातीचा दर्जा दिलेला आहे.

**अल्पसंख्यंकांच्या समस्या**

भारतात आणि जागतीक स्तरावर सुध्दा अल्पसंख्यांक समुदायांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. वर्णवाद आणि असमानतेची वागणुक या जागतीक स्तरावर अशा समस्या आहेत. ज्यांचा सामना जवळपास जगातील सर्वच देशातील अल्पसंख्याकांना करावा लागत आहे. भारतासारख्या देशात जिथे अनेक धर्माचे व अनेक भाषा बोलणारे लोक राहतात तिथे सुध्दा अल्पसंख्यकांसमोर अनेक समस्या आहे. यातील मुख्य समस्या आहे.

१. समानतेची समस्या :– भारता सारख्या देशात आजही अल्पसंख्यांक समुदायांचा-समानतेची वागणूक मिळतांना दिसत नाही. त्यामुळे या समुदायांना स्वयंविकासाच्या अनेक संधी पासुन वंचित रहावे लागते.

२. स्वतःची ओळख निर्माण करण्याची समस्या :–भारतात बहुसंख्य हिंदुसमोर अल्पसंख्यंकांना स्वतःची ओळख स्वतंत्र ओळख निर्माण करण्या करीता सतत संघर्ष करावा लागत आहे.

३. सुरक्षिततेची समस्या :– वरील समस्येव्यतीरिक्त अल्पसंख्याक समोर असलेली महत्वाची समस्या म्हणजे सुरक्षिततेची समस्या होय. देशातील काही अल्पसंख्याक समुदायाच्या लोकांना आपण असुरक्षित आहोत अशी भावना त्यांच्या मनात निर्माण झाली आहे. अलिकडच्या काही वर्षात देशात धार्मिक उन्मादाचे व



Scanned with CamScanner

असहिष्णुतेचे जे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे असुरक्षिततेची भावना निर्माण होणे स्वाभाविकच आहे.

**भारतीय संविधान आणि मानवाधिकार**

भारतात 1950 मध्ये संविधान लागु करण्यात आले. संयुक्त राष्ट्रसंघाने स्विकारलेल्या मानवी अधिकारांविषयी सार्वत्रिक जाहीरनाम्याचे प्रतिबिंब भारतीय संविधानातही पडल्याचे स्पष्टपणे दिसून येते. घटनाकारांनी मानवी अधिकारांना एवढे महत्त्व देण्याचे कारण, की नागरीकांचे हक्क आणि स्वातंत्र्य हे लोकशाही व्यवस्थेचे मुख्य आधार आहेत. हे ते ओळखुन होते. भारतीय संविधानात मनुष्याच्या मुलभूत अधिकारांबाबत स्वतंत्र्यपणे अध्याय तीन मध्ये उल्लेख करण्यात आला आहे. परंतु तरी सुध्दा कित्येक वर्षे भारतात मानवाधिकार आयोग अस्तित्वातच नव्हता. भारतात 1993 मध्ये मानवि अधिकारांच्या रक्षणासाठी एक स्वतंत्र कायदा करण्याचा निर्णय संसदेने घेतला हाच सन 1993 चा मानवी हक्क संरक्षण कायदा होय. या कायद्यात राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची स्थापना करण्यासंबंधी तरतुद करण्यात आली व या तरतुदी नुसार 1993 मध्ये भारतात मानवाधिकार आयोगाची स्थापना झाली.

**राष्ट्रीय अल्प संख्यांक आयोग**

भारत सरकारने 1992 च्या अल्पसंख्यांक राष्ट्रीय आयोग कायद्याअंतर्गत 1993 मध्ये आल्पसंख्यांका साठीच्या राष्ट्रीय आयोगाची स्थापना केली. सन 2004 मध्ये सरकारने या आयोगाला घटनात्मक दर्जा प्राप्त करून देण्याच्या उद्देशपाने 103 वे घटना दुरूस्ती विधेयक लोकसभेत मांडले

**राष्ट्रीय अल्प संख्यांक आयोगाची कार्ये**

या आयोगाची कार्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१. धार्मिक अल्पसंख्यांकांच्या रक्षणासाठी संविधानात असलेल्या तरतुदींची कार्यवाही कशाप्रकारे होते याचे मुल्यमापन करणे.

२. अल्पसंख्यांकांच्या हितरक्षणासाठी करण्यात आलेले कायदे आणि घटनात्मक तरतुदी यांच्या परिणामकारक अंमलबजावणी साठी सरकारला शिफारशी करणे

**संदर्भ**

१. भारत मे मानव अधिकार – अरूण चतुर्वेदी संजय लोढा
२. भारत का राष्ट्रीय मानव अधिकार आयोग गठन, कार्य और भावी परिदृष्य – अरूण कुमार भिलाई
३. मानव अधिकार – डॉ. मधु मंजरी दुबे
४. मानवी हक्क – प्रा. व्ही. बी. पाटील
५. Implementation of Basic Human Right -Dr. Manoj Kumar Sinha



Scanned with CamScanner